**<u>सं.फौ.ख.क्र. ८६९/२०१९ मधील निशाणी क्र. ५३ व ५५ वरील एकत्रित आदेश</u>**

फिर्यादीने नि.क्र. ५३ वर न्यायालयाच्या दिनांक ०५/१२/२०२२ रोजीचे अंतरीम नुकसान भरपाई देण्याच्या आरोपीने पालन न केल्याने त्याच्या विरुद्ध फौ.प्र.सं. कलम ४२१ अन्वये वॉरंट काढण्याकरीता दाखल केला आहे. तसेच आरोपीने सदर अंतरीम नुकसान भरपाईची रक्कम भरण्याकरीता मुदत मिळण्याचा अर्ज नि.क्र. ५५ वर दाखल केलेला आहे. फिर्यादीतर्फे विद्वान विधिज्ञ श्री. डी.एम.बर्गे व आरोपीतर्फे विद्वान विधिज्ञ श्री. यु.आर. शेटे यांचा युक्तीवाद ऐकला. सदर दोन्ही अर्जाचे व त्यावरील म्हणण्याचे अवलोकन केले.

२. दिनांक ०५/१२/२०२२ रोजी न्यायालयाने आरोपीला ६० दिवसांच्या आत धनादेशाच्या रक्कमेच्या ५% रक्कम अंतरीम नुकसान भरपाई म्हणून फिर्यादीस देण्याचा आदेश केला होता. परंतु आरोपीने आजतागायत सदरची रक्कम भरलेली नाही. आरोपीने रक्कम भरणेचा मुदतीचा अर्ज दिनांक ०२/०३/२०२३ रोजी दाखल केल्याचे दिसून येते. तसेच आरोपीची सदर पैसे भरण्याची इच्छा असती तर आजपर्यंत त्याने आदेशीत केलेल्या रक्कमेच्या काही अंशी रक्कम तरी फिर्यादीला दिली असती. परंतु आरोपीने त्याबाबत कोणतीही तजवीज केली नाही.

३. फिर्यादीने नि.क्र. ५३ वर दाखल केलेला अर्ज केवळ न्यायालयाने आदेशीत केलेल्या रक्कमेच्या वसूली करीता वॉरंट काढण्याकरीता दाखल केलेला आहे. आरोपीच्या विद्वान विधिज्ञांनी असा युक्तीवाद केला की, सदर अंतरीम नुकसान भरपाईची रक्कम वसूल करण्याकरीता न्यायालयाला वॉरंट काढता येणार नाही. तसेच त्यांनी त्यांची भिस्त मा. सर्वोच्च न्यायालयाच्या **नूर मोहम्मद वि. खुराम पाशा (२०२२) ९ एस.सी.सी. २३** या निवाडयावर ठेवलेली आहे. सदर निर्णयामध्ये मा. सर्वोच्च न्यायालयाने असे विशद केले आहे की, अंतरीम

नुकसान भरपाईची रक्कम वसूल करण्याची पद्धत पराक्रम्य संलेख अधिनियमामध्ये दिलेली आहे व त्या पद्धती व्यतिरिक्त सदर रक्कम न भरल्यास आरोपीला उलटतपास घेण्याची परवानगी नाकारता येणार नाही. परंतु प्रस्तुत प्रकरणामध्ये वाद हा केवळ अंतरीम नुकसान भरपाईची रक्कम वसूल करण्याकरीता फौ.प्र.सं.क. ४२१ अन्वये वसूली वारंट काढायचे की नाही एवढाच आहे. त्यामुळे मा. सर्वोच्च न्यायालयाच्या न्यायनिवाडयाचा मान ठेवून मला असे वाटते की सदर न्यायनिवाडा या प्रकरणास लागू होत नाही आणि तो फिर्यादीच्या बाजूने लागू होतो. तसेच आरोपीने आजपर्यंत फिर्यादीस कोणतीही रक्कम दिलेली नाही. यावरुन असे दिसून येते की, आरोपीला केवळ प्रकरण लांबवायचे असल्याने आरोपीने सदरचा अर्ज दाखल केलेला आहे. त्यामुळे मी या निष्कर्षास आलो आहे की फिर्यादीचा नि.क्र. ५३ वरील अर्ज मंजूर होणस पात्र आहे व आरोपीचा नि.क्र. ५५ वरील अर्ज नामंजूर होणेस पात्र आहे. परिणामी, मी खालील आदेश पारित करीत आहे :

**<u>आदेश</u>**

१. फिर्यादीचा नि.क्र. ५३ वरील अर्ज मंजूर करण्यात येतो.

२. आरोपीचा नि.क्र. ५५ वरील अर्ज नामंजूर करण्यात येतो.

३. आरोपी विरुद्ध फौ.प्र.सं.कलम ४२१ अन्वये वसूली अधिपत्र काढण्यात यावे.

स्थळ – कोरेगाव　　　　　　　　( ए.ए.पाचरणे )

दि. ३०/०९/२०२२३　　　　　　न्यायदंडाधिकारी प्रथमवर्ग कोरेगाव.